आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ एप्रिल २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी राज्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग

- नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा आणि करचोरी रोखण्यात मदत होत असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन

- यंदाच्या पावसाळ्यात पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८४५ अंकांची घसरण

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी राज्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. आतापर्यंत ११ मतदारसंघामधे ३६ उमेदवारांनी ४५ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

राज्यात तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार असलेल्या कोल्हापूर आणि हातकणंगले मतदारसंघात आज महायुतीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील माने यांनी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह, चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, शंभूराज देसाई, धनंजय महाडिक, राजेश क्षीरसागर , रामदास कदम, इत्यादी नेते यावेळी उपस्थित होते. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी जोरदार शक्तीप्रदर्शन केलं.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी हातकणंगले मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आहे. अर्ज भरण्यापूर्वी त्यांनी कोल्हापूरच्या दसरा चौकात शक्तिप्रदर्शन केलं.

वंचित बहुजन आघाडीतर्फे माढा मतदारसघात रमेश बारस्कर यांनी, तर सोलापुरात राहुल काशिनाथ गायकवाड यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**सातारा** लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. त्याआधी काढलेल्या मिरवणुकीत पक्षाध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार पृथ्वीराज चव्हाण, तसंच शिवसेनेसह इतर मित्रपक्षांचे पदाधिकारी आणि नेते सहभागी झाले होते.

लातूर मतदारसंघात आज एका अपक्ष उमेदवारानं अर्ज दाखल केला, तर उस्मानाबाद मतदारसंघात ३ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले.

तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत येत्या शुक्रवारपर्यंत आहे.

**<><><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत विश्लेषण प्रणाली यांसारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा होत असून, करचोरी रोखण्यात मदत होत आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. नागपुरातल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - NADT मधे भारतीय महसूल सेवेच्या ७६ व्या तुकडीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे करदात्यांचा संबंधित व्यवस्थेवरचा विश्वास वाढतो, आणि नियमित कर भरण्यासाठी प्रोत्साहन मिळतं असंही धनखड म्हणाले.

राज्यपाल रमेश बैस आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष नितीन गुप्ता कार्यक्रमाला उपस्थित होते.

या तुकडीत एकूण ५८ अधिकारी असून, यापैकी २४ महिला अधिकारी आहेत.

<><><><><><>

भाजपाचा निवडणूक जाहीरनामा सर्व समाज घटकांसाठी असून, कारखानदारी आणि स्टार्टअप परिसंस्थेचा विकास, तसंच डिजिटल पायाभूत सुविधा निर्मितीच्या माध्यमातून रोजगार निर्मितीला समर्पित असा हा जाहीरनामा असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. शासकीय नोकऱ्यांमधे सर्व रिक्त जागा भरण्याचा निर्धार केला आहे, असं त्यांनी सांगितलं.

काँग्रेसनं ज्या राज्यांमधे विधानसभा निवडणुका जिंकल्या त्या राज्यामध्ये आपल्या जाहीरनाम्यातलं एकही आश्वासन पूर्ण केलं नसल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला आज सुरुवात झाली आहे.

त्यामुळे, आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारीत केलं जाईल.

<><><><><><>

यंदाच्या पावसाळ्यात पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ एम रविचंद्रन यांनी आज नवी दिल्ली इथं नैऋत्य मोसमी पावसाच्या अनुमानाबाबत बातमीदारांना माहिती दिली.

जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे, असं त्यांनी सांगितलं. मात्र वायव्य, पूर्व, आणि ईशान्येकडच्या राज्यांमधे काही भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

संपूर्ण देशात १ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर राहील, असं भारतीय हवामान शास्त्र विभागाचे महासंचालक मृत्यूंजय मोहपात्रा यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ८४५ अंकांची घसरण झाली, आणि तो ७३ हजार ४०० अकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४६ अंकांची घसरण नोंदवत  २२ हजार २७३ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

निवडणुकीत प्रत्येक मतदार महत्त्वाचा असतो.  या सर्व मतदारांचा विश्वास मिळवणं महत्त्वाचं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. एका खाजगी वृत्तवाहिनीला मुलाखत देतांना ते बोलत होते. येत्या  २५ वर्षाचा भारताच्या विकासासाठी पूर्णतः उपयोग करून भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवणार, हे माझं ध्येय आहे. मी गुजरातचाच विकास करतो असा आरोप माझ्यावर केला जातो. गुजरातचा विकास हा भारताचा विकास करताना आपोआप होणार. भारताला तुकड्यात बघणं हे भारताविषयी अज्ञानाचे लक्षण आहे. भारताची विविधता हीच भारताची शक्ती आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशाची निर्यात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. २०२२ – २३ या वर्षात एकूण निर्यात ७७६ अब्ज ४० कोटी डॉलर्स मूल्याची होती. ती यंदा ७७६ अब्ज ६८ कोटी डॉलर्स मूल्याची असेल असं अनुमान आहे.  या वर्षात इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या निर्यातीत सर्वात जास्त म्हणजे

२३ पूर्णांक ६४ शतांश टक्के वाढ झाली. औषधं, अभियांत्रिकी यंत्रसामुग्री, लोह खनिज, सुती धागे, आणि हातमागावरच्या वस्त्रांच्या निर्यातीतही लक्षणीय वाढ झाली. शेतमालाच्या निर्यातीतही सात ते एकोणीस टक्के वाढ नोंदवली गेली.

<><><><><>

घाऊक किमतीवर आधारित चलनफुगवट्याच्या दरात मार्च मधे किंचित वाढ झाली. भाजीपाला,कांदे, बटाटे आणि इंधन तेलाच्या दरांमधे वाढ झाल्यानं महागाईचा दर ५३ शतांशांवर पोहोचला. फेब्रुवारी २०२४मधे हा दर २० शतांश टक्के होता.

<><><><><>

१८ व्या लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्याचं मतदान होण्याआधी केलेल्या प्रतिबंधक कारवायांमध्ये देशभरात तब्बल ४ हजार ६५० कोटी रुपये मूल्याचा अवैध माल जप्त केल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगानं दिली आहे. आजपर्यंतची ही विक्रमी जप्ती आहे. या जप्तीमध्ये सर्वाधिक ४५ टक्के वाटा हा अंमली पदार्थांचा असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

<><><><><>

नाशिकमध्ये पहिल्या आसाम रायफल्स माजी सैनिक संघ केंद्राचं येत्या २१ एप्रिलला उद्घाटन होणार आहे. यानंतर माजी सैनिक रॅलीचे आयोजनही करण्यात आले आहे. या केंद्रात १०७ माजी सैनिक असून त्यांना विविध सुविधा आणि सेवांचा पुरवठा हे केंद्र समर्पित करणार आहे.

<><><><><>

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी आज पनवेलच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रभात फेरी घेण्यात आली. तसंच आशा सेविकांनी मावळ लोकसभा मतदारसंघातल्या पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये विविध ठिकाणी महिलांच्या बैठका घेऊन मतदान

जनजागृती केली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी मतदान जनजागृतीपर रांगोळी स्पर्धाही आयोजित केली होती.

**<><><><><>**

ताडोबा इथून आणून नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सोडलेल्या वाघीणीची शोधमोहीम अखेर यशस्वी झाली. तिला बसवलेले सॅटेलाईट जीपीएस कॉलर जमिनीवर पडलेले आढळले होते आणि ती वाघीण गायब झाली होती. आज सकाळी त्या वाघिणीला पकडून तिला पुन्हा जीपीएस ट्रॅकर लावून अभयरण्यात सोडण्यात आले आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे. बंगळुरुतल्या एम. चिन्नास्वामी मैदानावर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातल्या बल्लारशाह रेल्वे स्थानकावर आज दुपारी अहमदनगरकडे जाणाऱ्या मालगाडीचे दोन डब्बे रुळावरून खाली घसरले. यामुळे त्या फलाटावरची वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. मात्र बाकीच्या रुळावरून वाहतूक सुरळीत चालू होती अशी माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या चारही मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान यंत्रांची सरमिसळ आणि मतदारसंघनिहाय मतदान यंत्रं ताब्यात घेण्याची प्रक्रिया उद्या होईल. विधानसभा

मतदारसंघनिहाय मतदान यंत्रांच्या  पृथक्करणाची प्रक्रिया नंतर सहा ते सात दिवस सुरू राहणार आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**